International Indexed, Refereed Research Journal, ISSN-2250-2629(Print), E-ISSN 2320-5466, Issue-3, Vol-I, March-2013

शोध पत्र - मराठी

# संत तुकाराम : तत्कालीन समाजजीवन आणि साहित्य

* प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड़
* श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर जि . अमरावती

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रामध्ये १३ व्या शतकात अनेक धर्मपंथ उदयास आले. त्यामध्ये प्रामुख्याने महानुभाव पंथ व वारकरी संप्रदाय यांचा विशेष विस्तार झाला. या दोन्ही पंथांनी आपापल्या मतांचा पुरस्कार केला. संत ज्ञानेश्वरांनी धार्मीकदृष्टया आध्यात्मिक लोकशाहीची स्थापना करुन समतेचा पुरस्कार केला त्यामुळे अनेक जातीधर्माचे संत निर्माण झाले. ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायाच्या आधारे भागवत धर्माचा पाया रचला. या वाटचालीमध्ये वारकरी संप्रदायाचाकळस होण्याचे भाग्य संत तुकारामास लाभले. वारकरी संप्रदायाचा कळस झालेले तुकाराम महाराज "गेल्या तीनचार शतकांच्या कालखंडात तुकाराम हे महाराष्ट्रीय लोकांच्या भावविश्वाचे एक अतूट, अविभाज्य अंग बनले. त्यांचे अभंग ही या लोकांच्या संस्कृतीला फुटलेली ताजी, टवटवीत पालवी ठरली. त्यांचे आचारविचार हे या लोकांच्या दृष्टीने निरामय, निरागस आदर्श ठरले. स्वाभाविकच, या काळात लोकांनी त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव केला.हे प्रेम इतके उत्कट होते, की अक्षरश: असंख्या कुटुंबांनी या तुकारामांच्या पाठोपाठ आपल्याही घरात एक नव्या तुकारामाचे अस्तित्व बहरावे, असे स्वप्न पाहिले, आपल्याला तुकारामासारखा पुत्र व्हावा, अशी आकांक्षा बाळगली." १.असे हे संत तुकाराम गेल्या तीनशे वर्षांपासून जनसामान्यांच्या आणि संतजनांच्या हृदयात स्थिरावले आहेत.त्यांचे अभंगवाङ्मय हे अक्षरवाङ्मय आहे. ते आजच्याही सामाजिक परिस्थितीत समाजाला उपयुक्त आहे.त्याच्या अभंगातील विषय, आशय आणि अभिव्यक्ती ह्या कधी भंग न पावणाऱ्या आहेत. त्यांची अभंगगाथा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असून त्यांचे सामाजिक विचार हे प्रेरणदायी आहेत. या अभंगातून धर्मकारण, राजकारण, समाजकारण तसेच शेती व्यवसाय इत्यादींचे संदर्भ येतात. त्यांची भूमिका एखाद्या महान तत्ववेत्यासारखी आहे.

संत तुकारामच्या अभंगाची संख्या ही सुमारे पाच हजार आहे. त्याचे अनुभवविश्व अफाट आहे. संत नामदेवाची आज्ञा शिरोधार्थ मानून अभंग लेखनाला सुरवात केली आणि ती गाथा म्हणून उदयास आली. 'अंतरीचे ध्यावे स्वभावे बाहेरी' असा त्यांचा आत्मानुभव आहे. म्हणूनच संत तुकारामाचे जीवनचरित्र आणि अभंग हे अव्दैत वाटतात. याबाबतीत प्र.न.जोशी म्हणतात,- "देहूचे श्रीसंत तुकाराम महाराज हे असे महाभाग्यवान व साक्षत्कारी संत पुरुष होवून गेले की, त्यांच्या वाङ्मयावरील लोभ महाराष्ट्रातील माणसांचा दिवसेंदिवस वाढत राहिला आहे. ज्ञानेश्वर हे संतांचे तत्ववेत्यांचे, कवीचे मुकुटमणीच. त्यानीच खरे म्हणजे भागवत धर्माचा आणि आपल्या सौदर्यात्मक चिंतनाने त्या संस्कृतीला समृध्द केले. त्यांची अभंगवाणी बहुपरिणामात्मक असल्यामुळे रसिकांना ते वेगवेगळया कारणांनी आवडते.कोणला ती धार्मीकदृष्टीने पूज्य वाटते. ( तात्विक ) पाया घातला. नामदेव महाराजांनी त्याचा विस्तार केला.एकनाथांनी त्याचा जिर्णोध्दार केला व श्री तुकाराम महाराज 'कळस' रुपाने या देखण्या व प्रसादपूर्ण प्रसादावर झळकू लागले. ज्ञानेश्वर, नामदेव या दोन शब्दातून अवघ्या महाराष्टाचे जीवन उमलत राहिले. देहुच्या या साध्याभोळया पण परमार्थिक व व्यवहारास पक्क्या असणाऱ्या तुकोबांनी ज्ञानेश्वरांचे तत्वज्ञान आपल्या अभंगवाणीने शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत नेऊन उभे केले. तुकारामबुवांच्या अभंगवाणीतील भावतुषारांनी अवघा महाराष्ट्र पावन होऊन गेला आहे." [२] याचे प्रत्यंतर आपणास त्याच्या अभंगाव्दारे येते. त्याची अभंगवाणी आजही सर्वसामान्य जनतेच्या हृदयात विराजमान आहे कारण त्यांची वाणी जीवनानुभवातुन जन्मास आली आहे. पंडितापासून तर सर्वसामान्य माणसापर्यंत प्रत्येकाला मोहित करणारी अशीच आहे. या त्यांच्या प्रतिभेविषयी डॉ. आ. ह. साळुखे म्हणतात - मानवी जीवनातील नाना प्रकारच्या उत्कट अनुभवांना अत्यंत आशयघन शब्दात साकार करणारा एक शब्दार्थप्रभू प्रतिभावंत.धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देणारा एक आचारशील भक्त. अक्षरश:सर्वस्वपणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपटणारा एक आव्हानवीर योध्दा. प्रतिभावंत, भक्त आणि योध्दा या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरुष - कवि तुकाराम या संत तुकारामाचे नाव माहित नाही, असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. इतके ते मराठी मनावर खोल रुजले आहेत.

**तत्कालीन समाजजीवन आणि संत तुकाबाचे विचार :-**

सोळाव्या शतकापूर्वी महाराष्ट्रातील समाजव्यवस्था ही पुरोहिताच्या हाती होती. वैदिककाळात स्त्री -शूद्रांना असणारे स्वातंत्र्य पुराण काळात नष्ट झाले होते. चार्तुवण्य व्यवस्थेची चौकट अधिक बळकट झाली होती. याविरुध्द बौध्द, जैन, महानुभाव, वारकरी संप्रदायाने प्रखर विरोध केला तरी सामाजिकदृष्टया समाजातील शुद्रातिशुद्र अन्याय सहन करीत होता. यासाठी वारकरी संप्रदायाने या उपेक्षित समाजाला न्याय व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी संघर्ष केलेला आहे. यासंदर्भात संत तुकारामाचे कार्य अतिशय प्रभावशाली होते. ते म्हणतात, -

*धर्माचे पाळण । करणे पाखंड खंडण ।। धृ ।।*
*हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ।। १ ।।*
*तीक्ष्ण उत्तरे । हाती घेऊनि बाण फिरे ।। २ ।।*
नाही भीड भार । तुका म्हणे सान थोर ।। ३ ।।

धर्माचे रक्षण करणे आणि सामाजिक नितिमत्ता राखणे हे संत तुकारामांना महत्वाचे वाटते. याबाबतीत संत तुकाराम आणि अंधश्रध्दा या लेखात ॲड.शंकर निकम म्हणतात - "धर्माच्या मंत्रशास्त्राच्या नावाखाली समाजाला लुबाडणाऱ्या, फसवणाऱ्या ढोंगी, मांत्रिकांवर, किर्तनकारावर, गोसाव्यावर, भक्तांवर जो प्रचंड प्रहार संत तुकारामांनी केला आहे ते एक कर्मयोगी सज्जनाच्या भूमिकेतूनच. हा प्रहार कोणचीही भिडभाड न ठेवता, अतिशय कठोर आणि कडक शब्दांत अभंगबध्द करुन संपूर्ण महाराष्ट्रात १७ व्या शतकात पूर्वार्धात भजन किर्तनाच्या माध्यमातून केला आहे." [५] तुकारामाच्या विचाराचे एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांना सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. धर्माचे पालन करुन पाखंड खंडण करणे, हे त्यांनी आपले जीवीतकार्य मानले होते. कोणाचीही भीडमूर्वत न ठेवता ते सामाजिक दांभिकतेवर तुटून पडतात. अशावेळेस त्यांच्या वाणीला शस्त्राची धार चढते. जे ढोंगी, दांभिक, पढीक, पंडित, स्वार्थी आहेत त्यांचा त्यांनी आपल्या अभंग वाङःमयातून परखडपणे समाचार घेतला. त्यांच्या टीकेचा मुख्य रोख भक्तीहीन पांडित्यावर आहे. ढोंगी साधु समाजाचे शोषण करणारे आहेत. हे संत तुकारामांनी जनसामान्यांना पटवून दिले्. ज्यानी समाजाला घडवायचे तेच दृष्ट लोक समाजाला नागवत आहे. तुकारामाची भूमिका जशास तशी आहे. ते सांगतात,-

*'भले तरी देऊ कासेची लंगोटी*
*नाठाळाच्या माथा देऊ काठी'*

या अभंगातून धर्माच्या नावावर नीतीमूल्यांचा गळा घोटणाऱ्या धूर्त समाजकंटकांना वठणीवर आणण्यासाठी तुकारामांनी आपल्या शब्दांच्या शस्त्राने फटकारले आहे. जे दृष्ट-पापी आहेत अशांना तुकाराम क्षमा करीत नाही पण भल्यासाठी मात्र ते आपले सर्वस्व द्यायला तयार होतात.

संत तुकारामाचा कुठल्याही व्यक्तीवर राग नसून विशिष्ट समाजविरोधी घातकी प्रवृत्तीवर आहे. तुकारामांच्याच काळात नव्हे तर सर्वच काळात अशा घातकप्रवृत्ती पूर्वापार चालत आलेल्या आहेत. ह्या घातक प्रवृत्ती सहजासहजी सुटत नाही तर त्यावर घावच घालावा लागतो. त्यासाठी निर्भयता आणि धाडस पाहिजे ती संत तुकारामांजवळ होती म्हणून ते म्हणतात-

*'गाजराची पुंगी । तैसे नव्हे झाले जोंगी*
*काय करोनी पठण । केली अंहता जतन*
*अल्प हे ज्ञान । अंगी ताठ अभिमान*
*तुका म्हणे लंड । त्याचे होणोनी फोडा थोबाड ।'*

अशाप्रकारे समाजातील ढोंगी साधू, गोसावी, जोगी, भगत या सर्वाच्या पिळवणुकीवर तुकारामांनी हल्ला केला आणि त्यांच्या ठिकाणी असणारा खोटेपणा उघडकीस आणला. तसेच त्यांना वाटते की, समाजाची मनोभुमीची मशागत करुन त्यामध्ये प्रांजळ, भक्तीभाव, निती आणि समाज उध्दारणाची विधायक प्रेरणा देणारे तुकाराम हे खऱ्या अर्थाने तत्वज्ञ, समाजसेवक होते. अशा या संत तुकारामाच्या अभंगवाणीचे संगोपन मध्ययुगीन संस्कृतीने आपला जीवनरस पूरवून केले आहे आणि आपल्या सौदर्यात्मक चिंतनाने त्या संस्कृतीला समृध्द केले. त्यांची अभंगवाणी बहुपरिणात्मक असल्यामुळे रसिकांना ते वेगवेगळ्या कारणांनी आवडते. कोणाला ती धार्मिकदृष्टीने पूज्य वाटते. कोणाला ती नैतिक सदाचाराच्या शिकवणीमुळे मान्य होते. कोणाला ती आपल्या सौदर्यशीलतेने भारुन टाकते. कवीची कविता कविला जागवत असते हे खरे परंतु कविचा प्रभाव काळापुरता टिकून राहतो. पण चारशे वर्षापूर्वीच्या प्रतिभावंत कवीची कविता अजूनही आपला तोल सावरते. हेच तुकाराम भावी समाज मनाला अधिक जवळचे वाटतील यात तिळमात्रही शंका नाही.

आजच्या जागतिकरणाच्या काळात स्वार्थी जगात व्यक्तीला समाजाभिमुख करण्यासाठी त्यांच्यात समाजिक मूल्य रुजविण्याची ताकद संत तुकोबांच्या अभंगात आहे हे या शोधनिबंधाच्या शेवटी नमूद करावेसे वाटते.

## संदर्भ ग्रंथ

१) साळूंखे डॉ. आ.ह., 'विद्रोही तुकाराम' गोपाळ मोकाशी, सदाशिव बागाईतकर स्मृतीमाला, १७६ सदाशिव पेठ, पुणे, व्दि. आ. मे. १९९९, पृ. ९
२) जोशी प्र.न. , ' सार्थ तुकाराम गाथा' , श्री भारत बुक डेपो ग्रंथ प्रकाशन, मुंबई -४, १९६६, पृ. ८
३) साळूंखे डॉ. आ. ह. ' विद्रोही तुकाराम' गोपाळ मोकाशी, सदाशिव बागाईतकर, स्मृतीमाला, १७६ सदाशिव पेठ, पुणे, व्दि. आ. मे. १९९९, पृ. ९
४) संत तुकाराम, 'श्रीसंत तुकारामबावाच्या अभंगाची गाथा', उ. नि, पृ. ३६६